आज नरक चतुर्दशी





# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 84 ■ गुरूवार, दि. 31 ऑक्टोबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# २०२४ मध्ये भाजपचा मुख्यमंत्री, तर २०२९ ला मनसेचा मुख्यमंत्री लिहून घ्या : राज ठाकरे

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी यंदाच्या विधानसभा निवडणुकांबाबत मोठे विधान केले आहे. महायुतीकडून यंदाच्या विधानसभा निवडणुका ह्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात लढल्या जात असल्याचे सांगण्यात येतंय. त्यामुळे, महायुतीची सत्ता आल्यास मुख्यमंत्री कोण होणार, कोणत्या पक्षाचा होणार यावर सध्या कुणीही भाष्य करत नाही. मात्र, राज ठाकरे यांनी २०२४ चा मुख्यमंत्री भाजपचाच होईल, असे म्हटले आहे. याशिवाय २०२९ चा मुख्यमंत्री हा मनसेचा होईल, असे भाकितही राज यांनी वर्तवले आहे. त्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. तसेच, राजकीय वर्तुळात राज ठाकरेंच्या या विधानाने बॉम्ब टाकल्याचेही दिसून येत आहे.

विधानसभा निवडणुकांमध्ये यंदा महायुती विरुद्ध महाविकास आघाडी यांच्यात थेट लढत होत आहे. मात्र, तिसरी आघाडी, मनसे आणि वंचित बहुजन आघाडी हे देखील पूर्ण ताकदीने मैदानात उतरले आहेत. मनसेनंही १०० पेक्षा अधिक जागांवर आपले उमेदवार उभे केले असून यंदा एकला चलो रे चा नारा दिला आहे. त्यामुळे, यंदाच्या निवडणुकीतील निकालाची सर्वांनाच उत्सुकता आहे. त्यातच, राज ठाकरे यांनी महाराष्ट्र व्हिजन या कार्यक्रमातून यंदाचा म्हणजेच २०२४ चा मुख्यमंत्री हा भाजपचाच होईल, तर २०२९ चा मुख्यमंत्री मनसेचा असेल, असे भाकीत केल्याने निवडणूक निकालापर्वीच राज ठाकरेंनी विधानभेचा निकालाच जाहीर केला असून हा आपला अंदाज असल्याचेही राज यांनी म्हटंलय. त्यामुळे, राज ठाकरेनी एकप्रकारे देवेंद्र फडणवीस यांना पुन्हा मुख्यमंत्रीपद मिळण्याची शक्यता असल्याचे सूचक विधान केले आहे. तसेच, मनसेच्या पाठिंब्यावरच हा भाजपचा मुख्यमंत्री होईल, असेही राज यांनी म्हटले.

अमित ठाकरेंविरुद्ध महायुती

दरम्यान, अमित ठाकरेंविरुद्ध महायुतीने व महाविकास आघाडीने उमेदवार दिला आहे. त्यामुळे, उद्धव ठाकरेंनी देखील पुतण्या अमितविरुद्ध मैदानात ठाकरेंचा उमेदवार उतरवल्याचं स्पष्ट झालंय. त्यावर बोलताना राज ठाकरे म्हणाले की, अमित विरोधात माहीममध्ये उमेदवार देणे हा, हा प्रत्येकाचा स्वभावाचा भाग झाला आहे. प्रत्येकजण आपल्या स्वभावानुसार वागत असतो. भाजपसारख्या मॅच्युअर्ड पक्षांना ही गोष्ट कळू शकते, सगळ्यांनाच हे कळेल असे नाही. बाकी प्रत्येकाचे मिळेल ते ओरबाडण्याचे प्रयत्न सुरु आहेत. आपण कोणाला कुठे आणि किती सांगायला जाणार, असे राज ठाकरे यांनी म्हटले.

मी शिवसेनेतून बाहेर पडलो, पक्ष फोडला नाही

राज्यात गत ५ वर्षात झालेल्या पक्ष फोडाफोडीच्या घटनेवरही राज यांनी परखड भाष्य केले. शिवसेनेतून बाहेर पडलो, त्यावेळी मी पक्ष फोडला नाही. मला पक्षातूल इतर नेते फोडून पक्ष निर्माण करायचा नव्हता असे राज ठाकरे म्हणाले. मला वेळ लागला तरी चालेल असे राज ठाकरे म्हणाले. मी शिवसेनेतून बाहेर पडलो तेव्हा शक्य असूनही आमदार फोडले नाहीत. मग मला सत्तेत येण्यासाठी कितीही वेळ लागला तरी चालेल. मला अशाप्रकारे फोडाफोडी करुन कधीही सत्ता नको, असे राज ठाकरे यांनी ठणकावून सांगितले. पण महाराष्ट्र आताच्या परिस्थितीतून बाहेर येईल. महाराष्ट्रावर खोलवर संस्कार झाले आहेत. यातून महाराष्ट्र बाहेर येईल. महाराष्ट्र खूप मोठा आहे. असे राज ठाकरे म्हणाले.



## राज ठाकरेंना निवडणूक आयोगाकडून मोठा धक्का!

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** विधानसभेच्या निवडणुकीमध्ये २५० च्या आसपास जागा लढवण्याची घोषणा करणारे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरें यांनी ना युती ना आघाडी असं धोरण जाहीर केलं होतं. राज ठाकरेंनी त्यानंतर सात वेगवेगळ्या याद्यांमधून मनसेचे उमेदवार जाहीर केले. मनसेनं यंदाच्या निवडणुकीमध्ये एकूण १३८ उमेदवार जाहीर केले आहेत. मात्र प्रत्यक्षात निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याआधीच मनसेला मोठा धक्का बसला आहे. राज ठाकरेंच्या एका सहकाऱ्याला निवडणुकीमध्ये जनतेच्या दारात जाऊन कौल मागण्याआधीच अपात्र ठरवण्यात आले आहे. त्यामुळे यंदा मनसेकडून १३७ उमेदवारच आपले नशीब मतपेटीतून आजमावणार आहेत हे स्पष्ट झाले आहे.

नेमके घडले काय?

अकोला जिल्ह्यातील अकोला पश्चिम मतदारसंघातून राज ठाकरेंच्या पक्षाने प्रशंसा आंबेरे यांना संधी दिली. प्रशांत आंबेरे यांनी आपल्या उमेदवारीचा रितसर अर्ज दाखल केला. मात्र तपासणीदरम्यान प्रशांत यांचा अर्ज रद्द करम्यात आला आहे. मनसेसाठी हा मोठा धक्का मानला जात आहे.

## तुळजापूरचे धोतर विधानसभेवर जाणारच

**तुळजापूर/प्रतिनिधी :** तुळजापूर विधानसभा मतदारसंघातून काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मधुकर चव्हाण यांनी बंडाचा झेंडा हाती घेतला आहे. पाच वेळा विधानसभेवर आमदार म्हणून गेलेले मधुकर चव्हाण यावेळी अपक्ष म्हणून विधानसभेची निवडणूक लढवत आहेत. ७० वर्ष मी ज्या पक्षाची सेवा केली, माझ्या घराची राखरांगोळी करु नका असं मी पक्षाला सांगितल्याचे चव्हाण म्हणाले. आता कोणत्याही परिस्थितीत मी माघार घेणार नाही. जनता माझ्या पाठीशी असल्याचे चव्हाण म्हणाले. तुळजापूरचे धोतर जनता विधानसभेवर पाठवणारच असेही चव्हाण म्हणाले.

अनेकांच्या घरात दोन पक्ष आहेत. मात्र माझ्यावर टीका होतेय. मी लढणार आणि जिंकणार असा विश्वास चव्हाण यांनी व्यक्त केला. मी पैलवान आहे, तुळजापूरचं हे धोतर विधानसभेवर जाणारच असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

तुळजापूर मतदारसंघात
तिरंगी लढत होणार

भाजप नेते राणा जगजितसिंह पाटील यांना महायुतीकडून तुळजापूर विधानसभा मतदारसंघात उमेदवारी मिळाली आहे. त्यांच्याविरोधात काँग्रेस पक्षाने धीरज पाटील यांना उमेदवारी दिली आहे. मधुकरराव चव्हाण यांनी काँग्रेसकडे उमेदवारी मागितली होती. मात्र, काँग्रेसने अखेर धीरज पाटील यांना उेमदावारी दिली आहे. त्यामनुळं काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मधुकरराव चव्हाण यांनी तुळजापूर विधानसभा मतदारसंघात बंडखोरी केली आहे.

## अभिनेता दर्शनला अखेर जामीन! रेणुकास्वामी हत्याकांड प्रकरणात मोठी अपडेट, काय होते हे प्रकरण?

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** कन्नड अभिनेता दर्शन थूगुदीपा आणि त्याची कथित प्रेयसी अभिनेत्री पवित्रा गौडा हे जून महिन्यात चाहत्याच्या हत्ये प्रकरणात अडकले होते. खरंतर ही माहिती समोर आल्यानंतर संपूर्ण दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीत खळबळ उडाली होती. या प्रकरणात दर्शनला अंतरिम जामीन मिळाला आहे. हा जामीन त्याला वैद्यकीय आधारावर मिळाला आहे.

खरंतर दर्शननं अंतरिम जामीन मिळावी म्हणून न्यायालता धाव घेतली होती. दर्शनने मणक्याची शस्त्रक्रिया करण्यासाठी वैद्यकीय कारणास्तव ही अंतरिम जामीनाची याचिका केली होती. दर्शनचा हा अंतरिम जामीन न्यायमूर्ती एस विश्वजीथ शेट्टी यांच्या एकल खंडपीठाने मंजूर केला आहे. दरम्यान, दर्शन आतापर्यंत बल्लारी तुरुंगात कैद होता. तर त्याचे वकील नागेश यांनी याचिकेत म्हटलं होतं की त्याचे दोन्ही पाय हे सुन्न झाल्याचे म्हटलं त्यामुळे त्याला सर्जरीची आवश्यकता असल्यानं एका प्रायव्हेट हॉस्पिटलमध्ये सर्जरी करण्यासाठी अनुमती देण्याची परवानगी दिली. त्याशिवाय या सर्जरीचा जो काही खर्च असेल तो खर्च स्वत: दर्शन करणार आहे. या आधी सत्र न्यायालय २१ सप्टेंबरला जामीन अर्ज फेटाळला होता. त्यानंतर त्यांनी अंतरिम जामीनसाठी अर्ज केला होता.

कशी केली हत्या?

दर्शन आणि पवित्रा गौडा यांच्यासोबत एकूण १७ जण या गुन्ह्यात आरोपी आहेत. त्यांनी मिळून ज्या चाहत्याचे निधन केले त्याचे नाव रेणुकास्वामी होते. या ३३ वर्षीत तरुणाची हत्या करण्याआधी त्यांनी त्याचा एक फोटो काढल्याचे म्हटले गेले. इतकंच नाही तर रेणुकास्वामीला त्यांनी आधी विवस्त्र करून मारहाण केली त्यानंतर तो सतत त्याला सोडून द्या अशी विननवी करत होता. रेणुकास्वामी हा एक रिक्षाचालक होता. रेणुकास्वामीच्या शरीरावर ३९ जखमा होत्या. याशिवाय दर्शन आणि त्याच्या मित्रांनी त्याला विजेचा झटका देण्यासाठी एक उपकरण आल्याचे देखील म्हटले जाते. दर्शन आणि त्याचे मित्रांनी रेणुकास्वामीला सतत मारहाण केली आणि त्यानंतर जेव्हा तो बेशुद्ध व्हायचा तेव्हा त्याच्या गुप्तांगाला विजेचा झटका दिला जायचा. या सगळ्या घटनेनंतर सगळ्यांना मोठा धक्का बसला होता.



## शरद पवारांनी केलेली नक्कल अजितदादांच्या लागली जिव्हारी; म्हणाले, राष्ट्रीय नेत्याला असली कृती शोभत नाही

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** शरद पवार यांची बारामती विधानसभा मतदारसंघातील अधिकृत उमेदवार युगेंद्र पवार यांच्या प्रचारार्थ काल कण्हेरी येथे सभा झाली. शरद पवार यांनी या सभेमध्ये अजित पवार यांच्या रडण्याची नक्कल केली. शरद पवारांनी अजित पवारांची केलेल्या नक्कलेची राजकीय वर्तुळात आता चांगलीच चर्चा रंगली आहे. याचदरम्यान शरद पवारांनी केलेल्या 'नक्कल'वर अजित पवार यांनी प्रतिक्रिया दिली.

शरद पवार हे राष्ट्रीय नेते आहे. प्रगल्भ नेते आहेत. त्यामुळे प्रगल्भ नेत्याने माझ्यासारख्या मुलाप्रमाणे असलेल्या माझी नक्कल करणे, साहेबांनी नक्कल करणे अनेकांना आवडले नाही. युगेंद्र पवारांनी किंवा इतरांनी केले असते तर ठीक होते, असे अजित पवारांनी म्हणाले. इतके दिवस वाटत होते की, राज ठाकरेच नक्कल करतात, पण काल साहेब ही दिसले, असे अजित पवार म्हणाले. मी शरद पवार साहेबांना देव मानले. त्यांनी माझी नक्कल केली. मी घरचा मुलगा होतो. माझी नक्कल त्यांनी करणे योग्य नव्हते, अशी प्रतिक्रिया अजित पवारांनी दिली.

मी साहेबांना दैवत मानलं आणि त्यांनी माझी नक्कल केली– अजित पवार

शरद पवारांना ज्या उंचीवर देश बघतो, महाराष्ट्र बघतोष्ठत्या मोठ्या नेत्याने माझी नक्कल केलेली अनेकांना पटली नाही. मी रात्र-दिवस एक करुन, सगळीकडे जाऊन निवडणुकीत काम केलं आहे. शरद पवारांनी मुलाप्रमाणे असणाऱ्याची नक्कल केली, हे अनेकांना आवडलेले नाही. मी रुमाल काढला नव्हता, त्यांनी रुमाल काढला. मी आईचे नाव घेतल्यानंतर थोडे भावनिक झालो होतो. कधी-कधी असे होते. पण माझे रडणे नैसर्गिक पद्धतीने झाले, असे अजित पवारांनी सांगितले. पण मी साहेबांना दैवत मानले आणि त्यांनी माझी नक्कल केली, याचे खूप वाईट वाटले, अजित पवारांनी अशा भावना व्यक्त केल्या.

नेमके प्रकरण काय?

अजित पवार शरद पवार घराण्यातील फुटीबाबत बोलताना भावूक झाले होते. डोळ्यात त्यांच्या अश्रू आले होते. मंगळवारी शरद पवार यांनी बारामतीमधील सभेत अजित पवार यांच्या रडण्याची नक्कल केली. या कृतीनंतर शरद पवारांच्या उपस्थित कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष केला.

## मालोजीराजेंकडे १४ कोटींवर संपत्ती; मधुरिमाराजे छत्रपती किती कोटींच्या मालकीण?

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात काँग्रेसला तीन ठिकाणी दिलेल्या उमेदवार बदलण्याची नामुष्की ओढवली. यामध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील कोल्हापूर उत्तर विधानसभा मतदारसंघाचा सुद्धा समावेश होता. कोल्हापूर उत्तरमधून राजेश लाटकर यांना काँग्रेसकडून उमेदवारी जाहीर करण्यात आली होती. मात्र काँग्रेसमध्येच प्रचंड असंतोष उफाळून आला. थेट काँग्रेस कमिटीवर हल्ला झाल्याने अवघ्या काही तासांमध्येच राजेश लाटकर यांची उमेदवारी रद्द करण्याची नामुष्की ओढवल्यानंतर माजी आमदार मालोजीराजे छत्रपती यांच्या पत्नी मधुरिमाराजे यांना काँग्रेसकडून उमेदवारी जाहीर करण्यात आली. काल (२९ ऑक्टोबर) मंगळवारी प्रचंड शक्तीप्रदर्शनाने काँग्रेस उमेदवारांचे अर्ज दाखल करण्यात आले. यामध्ये करवीरचे राहुल पाटील, कोल्हापूर उत्तरमधून मधुरिमाराजे छत्रपती आणि कोल्हापूर दक्षिणमधून आमदार ऋतुराज पाटील यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले.

मधुरिमाराजे छत्रपती किती कोटींच्या मालकीण?

दरम्यान मधुरिमाराजे छत्रपती यांनी दाखल केलेल्या उमेदवारी अर्जासोबत जोडलेल्या प्रतिज्ञापत्रामध्ये ७ कोटी ९० लाख २७५ रुपयांची संपत्ती त्यांच्याकडे असल्याचं म्हटलं आहे. मधुरिमाराजे यांनी सादर केलेल्या प्रतिज्ञा पत्रानुसार त्यांच्याकडे रोख ५८ हजार रुपये आहेत. विविध बँकांमध्ये ३६ लाख ८६ हजार २०९ रुपयांच्या ठेवी आहेत. माजी आमदार मालोजीराजे यांच्या नावे विविध बँकांमध्ये एक कोटी २१ लाख ५६ हजार रुपयांच्या ठेवी आहेत. विविध कंपन्यांच्या शेअर्समध्ये मधुरिमाराजे यांनी ७ लाख ९० हजार रुपयांची गुंतवणूक केली आहे. त्यांच्याकडे ९ लाख ५० हजार रुपयांची गाडी आहे. ७१९ ग्रॅम सोनं असून आजच्या बाजारभावाने त्याची किंमत ७७ लाख सहा हजार रुपये इतकी आहे.

पती मालोजीराजे यांच्याकडे एक कोटी ४७ लाख ५६ हजार रुपयांचे सोने आहे. याशिवाय स्थावर मालमत्तेतील गुंतवणूक ५८ लाख ९९ हजार इतकी आहे. मालोजीराजे यांची ८ कोटी ५८ लाख ४४ हजारांची मालमत्ता आहे. मालोजीराजे यांच्याकडे एकूण १४ कोटी १४ लाख ६१ हजार रुपयांची संपत्ती आहे. मुलगी यशस्विनीराजे यांच्याकडे दोन कोटी चार लाख २३ हजार ५९३, यशराजराजे यांच्याकडे तीन कोटी दोन लाख २३ हजार ५९३ रुपयांची मालमत्ता आहे.




## उद्धव ठाकरेंना संपविण्याचे काम काँग्रेस करत आहे; चंद्रशेखर बावनकुळेंचे प्रत्युत्तर

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** महायुतीतील पक्षात अंतर्गत मतभेद मोठ्या प्रमाणावर आहेत. महायुती एक विचित्र युती आहे. त्यामध्ये शिवसेना शिंदेंच्या पक्षाच्या जागावरती, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवारांच्या जागांवरती भाजप आपले उमेदवार देत आहे, त्यांच्या ठिकाणी देखील निवडणूक लढवत आहे. महायुतीचा कोणता प्रवाभ नाही, किंवा त्यांचे अस्तित्व देखील नाही. भाजपने एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेला आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीला या निवडणुकीतून संपवलं असल्याचं काँग्रेस नेते रमेश चेन्नथला यांनी म्हटलं आहे.



यावर बोलताना भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी पलटवार करत जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. काँग्रेस नेते रमेश चेन्नथला यांना महाराष्ट्राचा अभ्यास नाही. उद्धव ठाकरेंना संपविण्याचे काम काँग्रेस करत आहेत. आमच्यासोबत असताना उद्धव ठाकरेंना किमान १७१ वगैरे जागा मिळायच्या. मात्र आता ते जागावाटपात मागे पडत आहेत. किंबहुना ठाकरेंच्या जागेवर काँग्रेसचा उमेदवार लढत आहे. आम्ही मातोश्रीचा सन्मान करायचो. पण आज काँग्रेस ठाकरेंच्या जागांवर निवडणूक लढवत असल्याचे चित्र असल्याचे चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले.

काँग्रेसने मुस्लिम समाजाशी बेईमानी केली– चंद्रशेखर बावनकुळे

भाजपकडून एकही मुस्लिम उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात नाही, अशी टीका विरोधकांनी केली. यावर बोलताना चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, काँग्रेसला आमचा उलट प्रश्न आहे की, त्यांनी मुस्लिम परिवार आणि नेत्यांवर अन्याय केलाय. केवळ मतांसाठी वापर केलाय. विधानसभेपर्यंत नेतृत्व तयार करावे लागेल असे सांगून काँग्रेसने लोकसभेत मुस्लिम समाजाला भीती दाखवली आणि मते गोळा केली. भाजप मुस्लिम विरोधी आहे, असं काँग्रेसने भासवलं. काँग्रेसने मुस्लिम नेते असूनही उमेदवार दिले नाहीत, त्यांनी मुस्लिम समाजाशी बेईमानी केली, अशी टीकाही चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली.

राज्यातील काही मोजक्या ठिकाणी मैत्रीपूर्ण लढत

राज्यातील काही मोजक्या ठिकाणी मैत्रीपूर्ण लढती होतील. अशा काही उमेदवारांना एबी फॉर्म दिले आहेत. दरम्यान या बाबत एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस, अजितदादा सोबत बसून ठरवतील. तर पक्षांतर्गत बंडखोरी होते आहे. इच्छूक नेते नाराज आहेत. त्यामुळे मोठ्या प्रमाणात अपक्ष उमेदवार पाहायला मिळत आहेत. अजित पवार यांच्या सिंचन घोटाळा प्रकरणी मी बोलणं योग्य नाही, यावर दादा बोललेत. असे म्हणत चंद्रशेखर बावनकुळे यांनी अधिक बोलणे टाळले आहे. तर भाजपने कमी जागा का लढल्या? असे विचारले असता चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, महायुती आकड्यांसाठी निवडणूक लढत नाही. महायुतीचे सरकार आणण्यासाठी सर्व प्रयत्न करत आहेत. असेही ते म्हणाले.

# सिद्धार्थ खरात यांना मिळत आहे मतदार संघात भक्कम पाठिंबा..

## विविध समाज संघटनांची खरातांना समर्थ साथ!





**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर/प्रतिनिधी :** उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना व महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार सिद्धार्थ रामभाऊ खरात यांनी दोन दिवसांपूर्वीच अर्ज भरून अति विराट जनसमुदायाची त्यांना समर्थ साथ असल्याचे सिद्ध केले. त्यांना मेहकर लोणार विधानसभा मतदारसंघात प्रचंड प्रमाणात जनतेचा पाठिंबा मिळत असून. तालुक्यात घराघरात आणि मनामनात मतदार ,गोरगरीब, सामान्य ,शेतकरी ,शेतमजूर, तरुण, बेरोजगार, वृद्ध यांचा भक्कम पाठिंबा देत असून मेहकर तालुक्याच्या विकासासाठी एकच आवाज सिद्धार्थ रामभाऊ खरात असा नारा सर्वत्र ऐकायला मिळत आहे. याच पार्श्र्वभूमीवर समाजामध्ये समाज उत्कर्षासाठी काम करणाऱ्या विविध समाज संघटनांचा त्यांना स्वतःहून पाठिंबा मिळत आहे.

याबद्दल सविस्तर वृत्त असे की. संविधान रक्षक पँथर सेना च्या सर्व ४२ शाखा सह मेहकर येथील सर्व पदाधिकारी तसेच आदिवासी पँथर संघटना आणि बिगर सातबारा शेतकरी संघटना यांच्या सर्व शाखा चा सिद्धार्थ रामभाऊ खरात यांना पाठिंबा असून काल दिनांक ३० ऑक्टोबर २०२४ रोजी उबाठा शिवसेना कार्यालय मेहकर येथे समाज संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहून पाठिंबा दर्शवला. यावेळी विविध समाज संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी आपले मत व्यक्त करून संघटनेच्या मागण्या संदर्भात विचार व्यक्त केले. त्यामध्ये शिक्षण, रोजगार आणि आरोग्य या गोष्टीवर सिद्धार्थ खरात यांनी आमदार झाल्यानंतर मेहकर तालुक्यामध्ये काम करण्याचे अतोनात गरज आहे.तसेच समाजाच्या उन्नती साठी, शेतकऱ्याच्या मूलभूत प्रश्र्नासाठी, तरुणांच्या रोजगारासाठी काम करावे असा आशावाद सुद्धा समाज संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी यावेळी व्यक्त केला...या कार्यक्रम प्रसंगी सिद्धार्थ खरात यांनी समाज संघटनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांचा सत्कार केला. या कार्यक्रमाला उपजिल्हाप्रमुख आशिष रहाटे, शहर प्रमुख किशोर गारोळे यासह विविध शिवसैनिक उपस्थित होते. समाज संघटनेच्या वतीने संविधान रक्षक पँथर सेनेचे प्रमुख पदाधिकारी - पंकज वाघ, भीमराव सरदार, आकाश खोडके, समाधान वानखेडे, रणजित सतावर्ते, रुपाली ताई वानखेडे, गणेश बोरकर, लुकमान कुरेशी, सोपियान कुरेशी, सुनील कांबळे, मंगेश वानखेडे, प्रशांत बोरकर, महेश अवसरमोल आणि इतर सर्व पदाधिकारी आदिवासी पँथर संघटनेचे तालुका अध्यक्ष - गणेश भाऊ टाले आणि इतर सर्व पदाधिकारी बिगर सातबारा संघटनेचे अध्यक्ष - सुनील मिसाळ व इतर सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

## लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल

भारताचे पहिले उपपंतप्रधान, पहिले गृहमंत्री, लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांची आज जयंती. सरदार वल्लभभाई पटेल यांचा जन्म ३१ ऑक्टोबर १८७५ रोजी आणंद या छोट्याशा गावात झाला. त्यांचे वडील झव्हेरिभाई यांनी १८५७ च्या स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतला होता. त्यामुळे लहानपणीच त्यांना देशभक्तीचे बाळकडू मिळाले. त्यांच्या संपुर्ण कुटुंबावर स्वातंत्र्य चळवळीचा प्रभाव होता. सरदार पटेल हे हुशार विद्यार्थी होते. त्यांनी वकिलीचे शिक्षण पूर्ण करून बोरसाड येथे वकिली सुरू केली. एक अभ्यासू वकील म्हणून त्यांचे नाव सर्वदूर पोहचले पुढे ते बॅरिस्टर झाले. बॅरिस्टर झाल्यावर अहमदाबाद येथे त्यांनी वकिली सुरू केली. अल्पावधीतच एक निष्णात वकील म्हणून त्यांची कीर्ती देशभर पसरली. विकिलीसोबत त्यांना राजकारणाचीही आवड होती त्यामुळे त्यांनी अहमदाबाद पालिकेची निवडणूक लढवली त्यांनी ती निवडणूक सहज जिंकली. राजकारणात आल्यावर त्यांना जनतेचे मूलभूत प्रश्र्न समजू लागले. १९१७ साली खेडा जिल्ह्यात प्रचंड पाऊस झाला त्यामुळे खरिपाचे पीक वाया गेले. पुढे उंदराचा सुळसुळाट आणि किटकांमुळे रब्बीचे पीकही गेले त्यामुळे शेतकरी हवालदिल झाले. त्यातच दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाल्याने शेतकऱ्यांच्या हाती २५ टक्क्यांपेक्षाही कमी उत्पादन येईल अशी परिस्थिती निर्माण झाली. नैसर्गिक आपत्तीमुळे हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांना शेतसाऱ्यात सूट मिळावी, शेतसाऱ्याची वसुली पुढे ढकलावी यासाठी त्यांनी १८ हजार शेतकऱ्यांच्या सह्या असलेले निवेदन सरकारकडे दिले पण सरकारने त्याची दखल न घेता शेतसारा वसुलीसाठी शेतकऱ्यांवर जप्तीचे आदेश दिले त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला. महात्मा गांधी यांनी सक्तीच्या शेतसारा वसुली विरोधात खेडा येथे सत्याग्रह चळवळ सुरू केली. या चळवळीचे नेतृत्व त्यांनी सरदार पटेल यांच्याकडे सोपवले. शेतकऱ्यांचे हे आंदोलन त्यांनी अत्यंत निर्धाराने यशस्वी केले. या आंदोलनात त्यांनी केलेल्या नेतृत्वाने महात्मा गांधी भारावून गेले. पुढे महात्मा गांधी यांच्या प्रत्येक चळवळीत त्यांनी हिरीरीने भाग घेतला. नेतृत्वाप्रमाणेच त्यांचे वक्तृत्वही प्रभावी होते. आपल्या वक्तृत्वाने जनसामान्यांना प्रभावित करणाऱ्या सरदार पटेलांनी १९२८ साली सायमन कमिशन विरोधात पुकारलेल्या बारडोली सत्याग्रहादरम्यान लोकांना आपल्या महान विचारांनी प्रभावित केले त्यामुळे इंग्रजांनी अवाजवी वाढवलेल्या करांना न भरण्यावर जनता सहमत झाली त्यामुळे ब्रिटिश व्हाइसरॉयला पराभव पत्करावा लागला. या आंदोलनात आपल्या सशक्त नेतृत्वाने वल्लभभाई पटेल जनतेत चांगलेच प्रसिद्ध झाले आणि बारडोलीतील लोक त्यांना सरदार म्हणू लागले त्यामुळे त्यांच्या नावापुढे सरदार जोडले जाऊ लागले. १९३० साली सविनय कायदेभंग चळवळीत भाग घेतला म्हणून त्यांना इंग्रजांनी अटक केली. त्यांना पाच वर्षांचा तुरुंगवास भोगावा लागला. १९४२ च्या चले जाव आंदोलनातही त्यांनी भाग घेतला त्यावेळीही त्यांना अटक झाली. १९४६ झाली स्थापन झालेल्या हंगामी सरकारमध्ये ते गृहमंत्री होते. गृहमंत्री या नात्याने त्यांनी भारत पाक फाळणीच्या चर्चेमध्ये निर्णायक भूमिका बजावली. देश स्वातंत्र्य झाल्यानंतर पंडित नेहरूंच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळात ते उपपंतप्रधान बनले. त्यांच्याकडे गृहखाते, माहिती आणि नभोवाणी, संस्थांनचा प्रश्र्न व निर्वासितांचा प्रश्र्न व निर्वासितांचे प्रश्र्न सारखे महत्वाचे खाते देण्यात आले. स्वातंत्र्य भारताचे गृहमंत्री झाल्यावर सरदार पटेल यांनी सर्वात आधी भारतातील वेगवेगळ्या संस्थानातील राजांना आपल्या दूरदर्शीपणाचा आणि बुद्धिमत्तेचा वापर करून भारतात विलीन होण्याची सूचना केली. बहुतांश संस्थानांनी याला सहमती दर्शवून भारतात विलीन झाले पण जुनागड, हैदराबादचा निजाम, जम्मू काश्मीर च्या राजांनी भारतात विलीन होण्यास नकार दिला. सरदार पटेलांनी आपल्या कुशाग्र बुद्धिमत्तेच्या बळावर सैन्याचा वापर करीत या तिन्ही संस्थानांना भारतात विलीन केले. सरदार पटेल यांनी तत्कालीन ५६५ संस्थाने भारतात विलीन करून एकसंध भारत निर्माण केला त्यांची ही कामगिरी ऐतिहासिक अशीच होती. त्यांच्या याच कामगिरीने त्यांना लोहपुरुष ही पदवी देण्यात आली. १९५० साली त्यांचे स्वास्थ्य बिघडू लागले. २ नोव्हेंबर १९५० ला त्यांचे स्वास्थ्य इतके बिघडले की ते अंथरुणावरुन उठण्यास देखील असमर्थ होते. पुढे १५ डिसेंबर १९५० रोजी हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने त्यांची प्राणज्योत मालवली. सरदार पटेल यांना विनम्र अभिवादन!

## कोथिंबीरही गुणकारी



स्वयंपाकघरात कोथिंबिरीचा उपयोग होणार नाही असा एकही दिवस सापडणार नाही. अशा कोथिंबिरीचे औषधी गुणही बरेच आहेत. कोथिंबीर शरीराचा दाह शमवणारी तसेच तृष्णाशामक आहे. भूकवर्धक आणि अतिसाराला मारक अशी कोथिंबीर डोळ्यांसाठीही अतिशय गुणकारी आहे. जळजळ होत असल्यास कोथिंबिरीचा एक किंवा दोन थेंब ताजा रस डोळ्यांमध्ये टाकल्याने आराम मिळतो. ओल्या कोथिंबिरीबरोबरच धणेही तेवढेच उपयोगी आहेत. धणे व सुंठ समप्रमाणात घेऊन काढा करून प्यायल्याने खोकला हळूहळू कमी होऊन नाहीसा होतो. अतिसारावरही धण्याचा काढा करून प्यायल्याने उपयोग होतो. गर्भवती स्त्रियांना उलट्यांचा अधिक त्रास होतो तेव्हा १० ग्रॅम खडीसाखर आणि २.५ ग्रॅम धणे पावडर तांदळाच्या पेजमध्ये मिसळून दिल्यास उलट्या कमी होण्यास मदत होते. धणे मुखशुद्धीकारकही आहेत. पचनादी त्रास झाल्यास किंवा अजिर्णामुळे हैराण झाल्यास चहाच्या पावडरबरोबर धणे पूड वापरतात.

## लाभकारी बटाटा



सामान्यत: बटाटा खाल्ल्याने व्यक्ती लठ्ठ होते. त्यामुळे मधुमेह होण्याच्या धोक्यात वाढ होते, असे अनेक गैरसमज बटाट्याच्या बाबतीत समजले जातात. मात्र हा बटाटा आपल्या आरोग्याच्या दृष्टीने किती गुणकारी आहे हे कुणाला माहिती नसते. तर बघूया बटाट्याचे फायदे..१.बटाट्यामध्ये अनेक पौष्टिक तत्त्वं आहेत जी आरोग्यासाठी फायदेशीर असतात.२.बटाट्यामध्ये मोठय़ा प्रमाणावर पोटॅशियम आढळते जे आपल्या कमी रक्त दाबाला सामान्य करण्यासाठी गरजेचे असते.३.बटाटा सालीसह खाल्ल्यास तुम्हाला फायबर मिळते व या फायबरमुळे हार्टअँटॅकचा धोका कमी होतो.४.एखाद्या कमी वजनाच्या व्यक्तीस बटाटा खाण्याचा सल्ला डॉक्टर देतात. कारण त्यामुळे त्या व्यक्तीचे वजन वाढण्यास मदत होते.५.एखादी व्यक्ती भाजली असेल किंवा त्याला जखम झाली असेल तर त्या जखमेवर बटाट्याची साल लावतात. त्यामुळे जखम लवकर भरण्यास मदत होते.

## कडूलिंबाचे उपयोग

कडूलिंब हा वृक्ष अनेक प्रकारचे औषधी गुणधर्म धारण करणारा म्हणून ओळखला जातो. हे खरे असले तरी कोणत्या विकारावर कडूलिंबाचा कसा वापर करावा, याचे ज्ञान नसल्यामुळे आपल्या आसपास अनेक झाडे असूनही आपण विविध विकारांवर त्याचा वापर करत नाही. अशा प्रकारचा वृक्ष सोडून देऊन आपण शरीरात विष निर्माण करणारी इतर औषधे वापरत बसतो. लिंबाचे इतर अनेक उपयोग बघण्यासाठी त्वचेच्या सौंदर्यासाठी काय उपयोग होतात हे बघणे मनोरंजक ठरणार आहे. शरीराच्या सौंदर्यामधला कडूलिंबाचा सर्वात मोठा वापर म्हणजे सौंदर्यपिटीका कमी करणे. तरुण मुला–मुलींमध्ये हा त्रास जाणवतो. त्यावर अनेक प्रकारची औषधे वापरली जातात.



काही वेळा तारुण्यपिटिका फुटून चेहरा काळा पडतो. अशा अडचणींवर कडूलिंबांचा उपयोग होतो. कडूलिंबाची काही पाने गोळा करावीत आणि ती पाण्यात टाकावीत. पाणी गरम करावे. प्रदीर्घकाळ पाणी गरम केल्यास लिंबाच्या पानांचा हिरवेपणा कमी होतो. म्हणजेच पानांचा अर्क पाण्यात उतरलेला असतो. या पाण्याने चेहरा धुवावा. मुरुम कमी होतात. हेच असे उकळलेले पाणी स्नानाच्या पाण्यात मिसळावे किंवा बाथटबमध्ये टाकावे. त्याचा वेगळा उपयोग त्वचेला होतो. लिंबू, चंदन, हळद यांचा वापर चेहर्याच्या सौंदर्यासाठी होतो किंवा त्वचेच्या तुकतुकीतपणासाठी होतो.

तसा कडूलिंबाचा वापर होत नाही. कडूलिंबामुळे शरीराला त्रस्त करणारे काही संसर्ग कमी होतात. म्हणजे कडूलिंब आपल्या त्वचेवरची इन्फ्केक्शन्स् कमी करतो आणि परिणामी इन्फ्केक्शन्मुळे होणारे त्रास वाचतात. आपल्या शरीरावर पडणार्या सुरकुत्या किंवा पांढरे छोटे डाग हे आपल्या शरीरातल्या काही प्रक्रियांमुळे पडत असतात. ही प्रकिया कडूलिंबाच्या पानाच्या या पाण्यामुळे मंदावते आणि वृद्धत्वामुळे शरीरावर पडू पाहणार्या सुरकुत्या टळतात. कडूलिंबाचा पाला वाटून त्याचा रस गुलाब पाण्यात मिसळून तयार होणारे मिश्रण चेहर्याला लावल्यास चेहर्याचा तेलकटपणा कमी होतो.

काही लोकांची त्वचा कोरडी असते. तिच्यावर कडूलिंबाचा उपयोग होतो. कडूलिंबाची पाने, त्याचा रस ही औषधी म्हणून वापरावी लागतात. ते सौंदर्यप्रसाधन नाही हे लक्षात ठेवले पाहिजे. कडूलिंबाच्या पानांची पावडर वापरून तयार केले जाणारे शांपूसुद्धा केसांच्या आरोग्यासाठी उपयुक्त ठरतात.

## जास्त जेवल्यानंतर उद्भवणाऱ्या पोटफुगी साठी काय करावे?

एखाद्या निवांत दिवशी भरपूर जेवण केल्यावर किंवा जेवणामध्ये गोड पदार्थ जास्त खाल्ले गेल्याने तुम्ही पोटफुगी किंवा पोटदुखी याचा अनुभव घेतला असेलच. अशाप्रकारे उद्भवणाऱ्या पोटफुगीमुळे शरीर जडजड वाटायला लागते आणि मनुष्य अगदी अस्वस्थ होऊन जातो. पोटाची ही तक्रार अतिशय सतावणारी किंवा त्रासदायी ठरते. यासाठी काही सोपे पोट फुगी उपाय आम्ही येथे सुचविले आहेत ज्यांचा अवलंब करून तुम्ही यातून नक्कीच सुटका करून घेऊ शकता.

पोटॅशियमयुक्त अन्नपदार्थांचा आहारात समावेश करा:

आपल्या आहारामध्ये पोटॅशियम मुबलक प्रमाणात असलेले अन्नपदार्थ समाविष्ट करा. पोटॅशियममुळे आपल्या शरीरातील अतिरिक्त 'फ्लुइड्स' किंवा द्रव बाहेर पडून पोटफुगी कमी होते. म्हणून आपल्या आहारामध्ये केळी, रताळी, पालक, पिस्ते अशा पदार्थांचा समावेश आवर्जून करायला हवा.

सकाळचा नाष्टा टाळू नका – फायबरयुक्त पदार्थांचा नाश्त्यामध्ये समावेश करा:



बहुतेक लोक वेळेच्या अभावी किंवा आळस येतो म्हणून किंवा भूक लागत नाही म्हणून सकाळची न्याहारी करणे टाळतात आणि मग दुपारपर्यंत भूक अनावर झाल्याने दुपारच्या जेवणामध्ये भरपूर प्रमाणात अन्न सेवन करतात. रात्रीच्या जेवणातही पचण्यास जड पदार्थ सेवन केले जातात आणि परिणामी 'ब्लोटींग' होते, म्हणजेच पोट फुगू लागते. सकाळच्या वेळी नाश्ता न करणे हे पोट फुगण्याचे मुख्य कारण आहे. त्यामुळे सकाळी फायबरयुक्त पदार्थांचा आपल्या नाश्त्यामध्ये समावेश करावा. फायबरयुक्त पदार्थांच्या सेवनाने पोट पुष्कळ वेळ भरलेले राहते, त्यामुळे दुपारच्या जेवणामध्ये आपोआपच अन्न सेवन मर्यादित राहते. एखाद्या मेजवानीला जाण्यापूर्वी देखील फायबरयुक्त पदार्थांचे सेवन करावे. त्यामुळे आपोआप भूक कमी लागेल आणि मेजवानीतील तेलकट, मसालेदार, पचण्यास जड पदार्थांवर ताव मारण्याचा मोह आवरता येणे शक्य होईल.

व्यायाम चुकवू नका – शारीरिक हालचाली करत राहा:

जेवण झाल्यानंतर अनेक जणांना सुस्ती येते, शैथिल्य येते. या सुस्तीपायी अनेकजण आपल्या दिनचर्येतून व्यायामाला पूर्णपणे फाटा देऊन टाकतात. असे न करता आपल्या दिवसातील काही वेळ व्यायामाकरिता देणे आवश्यक आहे. व्यायाम करणे अशक्य असेल, तर जास्त शारीरिक हालचाली होतील अशी कामे निवडा. ऑफिसमध्ये किंवा खरेदीला पायी जावे, शक्यतो लिफ्टचा वापर न करता जिन्यांवरून चढत जावे, बागकाम करावे, घराची सफाई करावी. या हालचालींमुळे शरीराला आवश्यक तो व्यायाम मिळून अन्नपचन सुरळीत होते आणि पोट फुगणे कमी होते.

दिवसभरात भरपूर पाणी प्या:

आपल्या आहारामध्ये फायबरयुक्त पदार्थांच्या सेवनासोबतच भरपूर पाणी पिणे देखील समाविष्ट करावे. पाणी पिताना एकाच वेळी जास्त पाणी पिणे टाळावे. पाणी पिताना थोडे थोडे पाणी दिवसातून अनेकदा प्यावे. आपल्या शरीराला सामान्यपणे ३ ते ४ लिटर पाण्याची रोज आवश्यकता असते म्हणजेच दररोज तुम्ही न चुकता १० ते १५ ग्लास पाणी हे प्यायलेच पाहीजे.

आहारातील मिठाचे प्रमाण नियंत्रित करा:

आपल्या आहारातील मिठाच्या प्रमाणावर नियंत्रण ठेवावे. मिठाच्या अतिसेवनाने शरीरामध्ये फ्लुईड्स साठत राहतात आणि परिणामी पोट फुगू लागते.

पुदिन्याचा काढा किंवा चहा प्या:

जर जास्त खाण्यामुळे गॅसेस किंवा अपचन झाले तरी पोट फुगु लागते. अश्या वेळी पुदिन्याची पाने घालून केलेला काढा किंवा चहा पोटफुगी कमी करण्यास मदत करतो. परंतु या चहामध्ये साखर घालू नये.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४; छाननीअंती १८७ नामनिर्देशनपत्र पात्र तर १२ अपात्र

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : : भारत निवडणूक आयोगाने सार्वत्रिक विधानसभा निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर केला असून सातही विधानसभा मतदारसंघामध्ये १९९ उमेदवारांनी नामनिर्देशन अर्ज दाखल केले होते. त्यांची छाननी आज करण्यात आली. त्यानुसार १८७ अर्ज पात्र तर १२ नामनिर्देशने अपात्र ठरविण्यात आली आहेत.

सातही विधानसभा मतदारसंघात आज छाननी करण्यात आली. त्यामध्ये मलकापूर येथे २२, बुलढाणा येथे २१, चिखली येथे ४२, सिंदखेड राजा येथे ३५, मेहकर येथे ३०, खामगांव येथे २२ व जळगांव जामोद येथे १५ असे एकूण १८७ उमेदवारांचे नामनिर्देशन पात्र ठरले. तर मलकापूर व चिखली येथे प्रत्येक एक, सिंदखेड राजा येथे दोन, खामगांव व जळगाव जामोद येथे प्रत्येकी चार नामनिर्देशन अर्ज असे एकूण १२ अर्ज अपात्र ठरविण्यात आली आहेत.

जिल्ह्यातील सातही विधानसभा मतदारसंघनिहाय अवैध अर्ज

२१-मलकापूर मतदारसंघातील संगीता नौकरीया(अपक्ष), २३-चिखली मतदारसंघातील सुकेशनी शालीकराम गवई, २४-सिंदखेड राजा मतदारसंघातील प्रशांत दिलीप पाटील (नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी), सिद्धार्थ आबाराव सिनगारे (बहुजन समाज पार्टी), २६-खामगांव मतदारसंघातील गौरव तुलीसीराम सपकाळ(अपक्ष), अलका दिलीपकुमार सनंदा(भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस पार्टी), ड. दशरत भिकाजी वानखडे(बहुजन समाज पार्टी) व मो. बिलाल सत्तार(इंडियन युनीयन मुसलीम लीग), २७-जळगाव जामोद मतदारसंघातील अपर्णा संजय कुटे(शिवसेना उद्धव ठाकरे गट), विनोद सुखदेव इंगळे(बहुजन समाज पार्टी), प्रफुल्ल अरुण तायडे(रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडिया) व ज्ञानेश्वर समाधान मारोडे(अपक्ष).

जिल्ह्यातील सातही विधानसभा मतदारसंघनिहाय वैध अर्ज



२१- मलकापूर विधानसभा मतदार संघातील उमेदवारांचे नाव : चैनसुख मदनलाल संचेती (भारतीय जनता पार्टी), धिरज धम्मपाल इंगळे (बहुजन समाज पार्टी), राजेश पंडीतराव एकडे (इंडियन नॅशनल काँग्रेस), इंतेजार हुसेन सफदर हुसेन (मायनॅरिटिज डेमोक्रेटीक पार्टी), प्रविण लक्ष्मण पाटील (राष्ट्रीय समाज पक्ष), बळीराम कृष्णा धाडे (जयहिंद जय भारत राष्ट्रीय पार्टी), मोहम्मद जमीरुदिन मोहम्मद साबीरउदीन (वंचीत बहुजन आघाडी), शे. इमरान शे बिस्मील्ला (इंडीयन युनियन मुस्लीम लीग). अपक्ष उमेदवार : खान जफर अफसर खान, विजय प्रल्हाद गव्हाड, नसीर अ. रज्जाक, संदिप देविदास फाटे, भिवा सदाशिव चोपडे, मोहम्मद दानीश अब्दुल रशीद, योगेंद्र विठ्ठल कोलते, विरसिंह ईश्वरसिंह राजपुत, शेख अकील शेख मजिद, शेख आबीद शेख बशीर, सचिन दिलीप देशमुख, सुनिल वसंतराव विंचनकर, सौरभ चंद्रवदन इंगळे, हरीश महादेवसिंह रावळ.

२२- बुलढाणा विधानसभा मतदारसंघातील उमेदवारांचे नाव : जयश्री सुनिल शेळके (शिवसेना उध्दव बाळासोब ठाकरे), विजय रामकृष्ण काळे (बहुजन समाज पार्टी), संजय रामभाऊ गायकवाड (शिवसेना), प्रशांत उत्तम वाघोदे (वंचित बहुजन आघाडी), प्रेमलता प्रकाश सोनोरे (महाराष्ट्र स्वराज्य पार्टी), मोहम्मद गुफरान दिवान (स्वाभिमानी पक्ष), भाई विकास प्रकाश नांदवे (राष्ट्रीय समाज पक्ष), सतिश रमेश पवार (आझाद समाज पार्टी (कांशीराम)), सतीशचंद्र दिनकर रोठे पाटील (महाराष्ट्र विकास आघाडी), अपक्ष उमेदवार : अरुण संतोषराव सुसर, आरिफ खान विवन खान, जयश्री रविंद्र शेळके, जितेंद्र एन. जैन. निलेश अशोक हिवाळे, प्रमोद पुंजाजी कळसकर, डॉ. मोबीन खान अय्युब खान, मोहम्मद अन्सार मोहम्मद अल्ताफ, प्रा. रतन आत्माराम कदम, विजयराज हरिभाऊ शिंदे, प्रा. सदानंद मन्साराम माळी, स्वाती विष्णू कंकाळ.

२३ -चिखली विधानसभा मतदार संघातील उमेदवारांचे नाव : गणेश ऊर्फ बंडू श्रीराम बरबडे (महाराष्ट्र नवनिर्माण सेना), राहुल सिध्दविनाय बोंद्रे (इंडियन नॅशनल काँग्रेस), ड. शंकर शेषराव चव्हाण (बहुजन समाज पार्टी), सौ. श्र्वेता विद्याधर महाले (भारतीय जनता पार्टी), खालीद अहमद खान तालीब खान (जनतादल सेक्युलर), मच्छिंद्र शेषराव मघाडे (सोशलीस्ट पार्टी इंडीया), सौ. रेणुका विनोद गवई (बहुजन रिपब्लीकन सोशालीस्ट पार्टी), विजकांत सांडु गवई (रिपब्लिकन सेना), सिध्दांत अशोकराव वानखेडे (आझाद समाज पार्टी (कांशी राम)), सिध्देश्र्वर भगवान परिहार (वंचित बहुजन आघाडी), अपक्ष उमेदवार : अब्दुल रियाज अब्दुल समद सौदागर, अब्दुल वाहीद शे. इस्माईल, अविनाश निंबाजी गवई, देवानंद पांडुरंग गवई, नरहरी ओंकार गवई, नाजेमा नाज इम्रान पठाण, नासीर इब्राहीम सैय्यद, नितिन रंगनाथ इंगळे-राजपूत, प्रशांत पुरुषोत्तम ढोरे, बबन डिगांबर राऊत, मनोज सारंगधर लाहुडकर, मिलींदकुमार सुधाकर मघाडे, डॉ. मोबीन खान अय्युब खान, मोहमद रईस उस्मान मोहम्मद इद्रीस, मृत्युंजय संयज गायकवाड, सौ. रजनी अशोक हिवाळे, रविंद्र नारायण डाळीमकर, राजेंद्र सुरेश पडघान, राहुल जगन्नाथ बोंद्रे, राहुल प्रल्हाद बोर्डे, विजय मारोती पवार, विनायक रामभाऊ सरनाईक (अंभोरे), सौ. वृषाली राहुल बोंद्रे, शरद डिगांबर चेके-पाटील, शरद रमेश खपके, शेख मुनव्वर शेख इब्राहीम, शें. सईद शे. मुस्ताक बागवान, सतीश जिवन पंडागळे, सतीश मारोती गवई, सिध्दार्थ अंकुश पैठणे, संजय धोंडु धुरंधर, संतोष रमेश उबाळे.

२४- सिंदखेडराजा विधानसभा मतदार संघातील उमेदवारांचे नाव : डॉ. राजेंद्र भास्करराव शिंगणे (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार), प्रकाश भिवाजी गिते (बहुजन समाज पार्टी), डॉ शशिकांत नरसिंगराव खेडेकर (शिवसेना), मनोज देवानंद कायंदे (राष्ट्रवादी काँग्रेस पाटी), सविता शिवाजी मुंढे (वंचीत बहुजन आघाडी), सुरेश एकनाथ गुमटकर (जनहित लोकशाही पार्टी), दत्तात्रय दगडू काकडे (स्वतंत्र भारत पक्ष), शिवानंद नारायण भानुसे (संभाजी ब्रिगेड पार्टी), अपक्ष उमेदवार : सय्यद मुबीन सय्यद नईम, रामदास मानसिंग काहाळे, विजय प्रतापराव घोंगे, अंकुर त्र्यंबक देशपांडे, नामदेव दगडू राठोड, गायत्री गणेश शिंगणे, अशोक श्रीराम पडघान, डॉ. मनोरखा रशीदखा पठाण, कुरेशी जुनैद रौफ शेख, अभय जगाराव चव्हाण, भाई दिलीप ब्रम्हाजी खरात, राजेंद्र मधुकर शिंगणे, सुनील पतींगराव जाधव, शेख रफिक शेख शफी, मनसब खान सादतमीर खान पठाण, दत्तू रामभाऊ चव्हाण, ज्ञानेश्र्वर कैलास म्हस्के, प्रल्हाद रंगनाथ सोरमारे, बाबासाहेब बन्सी म्हस्के, सुधाकर बबन काळे, भागवत देविदास राठोड, अल्का रामप्रसाद जायभाये, अ. असिफ अ. अजीज, शिवाजी बाबुराव मुंढे, विजय पंढरीनाथ गवई, सुनील तोताराम कायंदे, सुरज धर्मराव हनुमंते.

२५- मेहकर विधानसभा मतदार संघातील उमेदवारांचे नाव : सिध्दार्थ रामभाऊ खरात (शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे), भैयासाहेब गोविंदराव पाटील (महाराष्ट्र नवनिर्माण सेना), संजय भास्कर रायमुलकर (शिवसेना), संजय समाधान कळसकर (बहुजन समाज पार्टी), डॉ. ऋतुजा ऋषांक चव्हाण (वंचित बहुजन आघाडी), दिपक केदार (महाराष्ट्र स्वराज्य पार्टी), नितीन बालमहेंद्र सदावर्ते (जयसेवालाल बहुजन विकास पार्टी), रजनिकांत सुधीर कांबळे (राष्ट्रीय समाज पक्ष), संघपाल कचरु पनाड (रिपब्लीक सेना), संदीप शामराव खिलारे (आझाद समाज पार्टी (कांशीराम)) अपक्ष उमेदवार : अशोक वामन हिवाळे, ङ ओम श्रीराम भालेराव, कैलास कचरु खंदारे, सिध्दार्थ प्रल्हाद खरात, डॉ. गोपालसिंह बछीरे, डॉ. जितेश वसंत साळवे, डॉ. जानु जगदेव मानकर, देविदास पिराजी सरकटे, नरहरी ओंकार गवई, प्रकाश गणपत अंभोरे, प्रकाश चिंधाजी गवई, पुनम विजय राठोड, भास्कर गोविंद इंगळे, महीपत पुंजाजी वाणी, मुरलीधर दगडू गवई, राजेश अशोकराव गवई, लक्ष्मणराव जानुजी घुमरे, वामनराव वानखेडे, डॉ. संतोष चंद्रभान तायडे, डॉ. सांची सिध्दार्थ खरात.

२६- खामगांव विधानसभा मतदार संघातील उमेदवारांचे नाव : आकाश पांडुरंग फुडंकर(भारतीय जनता पार्टी), धिरज धम्मपाल इंगळे सौ आश्रिवनी विजय वाघमारे (बहुजन समाज पार्टी), राणा दिलीपकुमार गोकुळ सानंदा (इंडियन नॅशनल काँग्रेस),शिवशंकर पुरुषोत्तम लगर(महाराष्ट नवनिर्माण सेना), देवराव भाऊराव हिवराळे(वंचीत बहुजन आघाडी), पवन केशव जैन वशीमकर (समता पार्टी), भिमराव हरीषचंद्र गवई (रिपब्लीक सेना), मोहमद आरीफ अब्दुल लतीफ(ऑल इंडीया मजलीस इ-इनकलाब-इ-मिलात), मो.हसन इनामदार (मायनॅरिटिज डेमोक्रेटीक पार्टी), शे.रशीद शे कालु (इंडीयन नॅशनल मुस्लीम लीग). अपक्ष उमेदवार : अमोल अशोक अंधारे, उध्दव ओंकार आटोळे, किरण रामचंद्र मोरे, निखिल मोहनदास थडे, प्रकाश वासुदेव लोखंडे, मोहम्मद फारुख अब्दुल वाहब, रमेश केशवराव खिरडकर, ड. रविंद्र ज्ञानदेव भोजने, सिध्दोधन भारत साळवे, शेख फारुख शेख बिस्मील्ला, शाम बन्सीलाल शर्मा.

२७ जळगाव जामोद विधानसभा मतदार संघातील उमेदवारांचे नाव : अमित रमेशराव देशमुख (महाराष्ट्र नवनिर्माणना), संजय श्रीराम कुटे ( भारतीय जनता पाटी), अजय सुखदेव शेगोकार (बहुजन समाज पार्टी), डॉ. स्वाती संदिप वाकेकर (इंडीयन नॅशलन काँग्रेस), डॉ. प्रवीण जनार्दन पाटील (वंचित बहुजन आघाडी), प्रशांत काशीराम डिक्कर (महाराष्ट्र स्वराज्य पार्टी). अपक्ष उमेदवार : अजहरउल्ला खान अमान उल्ला खान, सफसर खान शब्बीर खान, अरुण भिकाजी निंबोळकर, देवानंद शंकर आमझरे, पवन भावराव गवई, प्रकाश विठ्ठल भिसे, मंगेश विश्र्वनाथ मानकर, सुजीत श्रीकृष्ण बांगर, डॉ. संदिप रामदास वाकेकर.

सोमवार दि. ४ नोव्हेंबरपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख आहे. बुधवार दि. २० नोव्हेंबर रोजी मतदान तर शनिवार दि. २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. निवडणूक प्रक्रिया २५ नोव्हेंबरपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे.

## संक्षिप्त...

### मशाल चिन्हाने भ्रष्टाचाराचा रावण दहन करणार- प्रभाकर सोनवणे



दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी** : चोपडा मतदारसंघातून महाविकास आघाडीचे उमेदवार प्रभाकर सोनवणे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. आज उमेदवारी अर्ज छाननीमध्ये त्यांचा अर्ज वैध ठरला आहे. महाविकास आघाडीचे कार्यकर्ते व नेत्यांची बैठक होऊन प्रचाराचे नारळ फोडण्यात येईल आणि मशाल चिन्हाने भ्रष्टाचाराचे रावण दहन करण्यात येईल अशी प्रतिक्रिया यावेळी महाविकास आघाडीचे उमेदवार प्रभाकर सोनवणे यांनी दिली आहे.

### पुण्यात दिव्यांग मतदारांनी घेतली मतदानाची शपथ

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी** : विधानसभा कार्यालयामार्फत दिव्यांग मतदारांसाठी येत्या विधानसभा निवडणूकीसाठी मतदान केंद्रांवर आवश्यक सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार असल्याने दिव्यांगांना मतदान करणे सोपे होणार आहे, असे मत दिव्यांग मतदारांनी व्यक्त केले. निवडणूक निर्णय अधिकारी अर्चना यादव यांच्या मार्गदर्शनाखाली मतदारसंघामध्ये व्यापक प्रमाणात मतदान जनजागृती करण्यात येत आहे. त्याअनुषंगाने निगडी येथील व्यापारी संकुलाच्या जवळ झालेल्या दिव्यांग बांधवांच्या बैठकीदरम्यान मतदान जनजागृती करण्यात आली. यावेळी दिव्यांग व्यक्तींनी आपली मते मांडली, या मतदान जनजागृती कार्यक्रमास स्वीप नोडल अधिकारी प्रफ ुल्ल पुराणिक, दिव्यांग कक्षाचे नोडल अधिकारी शरद पाटील, सहाय्यक नोडल अधिकारी उमा दरवेश, बालाजी गिते, विशाल गायकवाड, प्रतिक लोखंडे, तसेच स्वीप विभागाचे राजेंद्र कानगुडे, दिनेश जगताप, संदीप सोनवणे, महालिंग मुळे, प्रहार दिव्यांग संघटनेचे अध्यक्ष दत्तात्रय भोसले, महिला अध्यक्ष संगीता जोशी,भारतातील पहिले सनदी लेखापाल भूषण तोष्णीवाल, राजेंद्र वाघचौरे, रमेश पिसे आणि दिव्यांग मतदार उपस्थित होते.बैठकीमध्ये सर्वप्रथम दिव्यांग बांधवांनी ''आम्ही भारताचे नागरिक, लोकशाहीवर निष्ठा ठेवून, प्रतिज्ञा करतो की, आपल्या देशाच्या लोकशाही परंपरांचे जतन करु आणि मुक्त नि:पक्षपाती व शांततापूर्ण वातावरणातील निवडणूकांचे पावित्र्य राखू व प्रत्येक निवडणूकीत निर्भयपणे तसेच आम्ही धर्म, वंश, जात, समाज, भाषा यांच्या विचारांच्या प्रभावाखाली न येता किंवा कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करू.''अशी शपथ घेऊन मतदान करण्याचा निर्धार व्यक्त केला.

## विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने चांदवड देवळा मतदारसंघातील कर्मचाऱ्यांची निवडणूक निरीक्षक यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी** : सार्वत्रिक विधानसभा निवडणूक २०२४ करिता ११८ चांदवड देवळा विधानसभा मतदारसंघातील सर्व नोडेल अधिकारी व निवडणुकीचे कामकाजासाठी नियुक्त कर्मचारी यांची निवडणूक निरीक्षक यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली. तसेच निवडणूक निरीक्षक अधिकारी यांनी चांदवड शहरातील व ग्रामीण भागातील मतदान केंद्रावरील सर्व सोयी सुविधा बाबत माहिती घेऊन दिव्यांग मतदार यांना मतदान केंद्रावर रॅम्पची व्यवस्था व व्हील




चेअर ठेवण्याबाबत, वाहतूक आराखडा इव्हीएम टपाली मतदान, एक खिडकी कक्षा मधून उमेदवारांना प्रचारासाठी परवानगी भरारी पथक स्थिर संरक्षण पथक व्हिडिओ संरक्षण पथक कार्यान्वित ठेवण्याची आदी सूचना निवडणूक निर्णय अधिकारी व तहसीलदार व संबंधित कर्मचारी यांना देण्यात आल्या आहेत. त्यानंतर सर्व निवडणूक लढविणाऱ्या उमेदवार व त्यांचे प्रतिनिधी यांची बैठक घेण्यात आली. बैठकीमध्ये त्यांना आचारसंहिता अंमलबजावणी, प्रचार सभा बाबत परवानगी, हेलिकॅप्टर बाबत परवानगी खर्च मुदतीत सादर करण्याबाबत माहिती तसेच आचारसंहिता काटेकोर अंमलबजावणी बाबत मार्गदर्शन करण्यात आले आहे. सदर बैठक निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपयोगी अधिकारी चांदवड कैलास कडलक सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी मंदार कुलकर्णी,मिलिंद कुलकर्णी, मच्छिंद्र साबळे, पोलीस निरीक्षक चांदवड कैलास वाघ, पोलीस निषेध देवळा ज्ञानेश्र्वर जाधव, निवडणूक खर्च सह नोडल अधिकारी गोविंद पानपाटील या बैठकीत उपस्थित होते.

### तीन खाजगी सुरक्षा रक्षकांकडून तरुणाला बेदम मारहाण; मारहाणीत तरुणाचा मृत्यू

**कल्याण/प्रतिनिधी** : स्मार्ट सिटीच्या अतंर्गत सुरु असलेल्या पुलाच्या कामासाठी रस्त्यावर बॅरिकेटिंग करण्यात आली आहे. या दरम्यान एका तरुणाला खाजगी सुरक्षा रक्षकाने त्या दिशेने जाण्यासाठी मज्जाव केला. यावरुन सुरक्षा रक्षक आणि तरुणामध्ये वाद झाला. या वादात सुरक्षा रक्षकाने राजकुमार यादव या नावाच्या तरुणाला बेदम मारहाण केली. या मारहाणीत राजकुमार यादव याचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या प्रकरणात कल्याणच्या महात्मा फुले पोलिसांनी सीसीटीव्हीच्या सहाय्याने पसार झालेल्या तीन सुरक्षा रक्षकांना अटक केली आहे. राहुल शिंदे, सचिन शिंदे आणि विजय ढांगे अशी या तीन आरोपींची नावे आहेत.

## नांदुरा येथे एका नवीन मतदान केंद्राची निर्मिती; २१-मलकापूर विधानसभा मतदारसंघात ३०५ मतदान केंद्र

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : विधानसभा निवडणूकीत मतदारांना मतदान करणे सोईचे व्हावे, यासाठी भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदारसंघात मतदान केंद्राचे सुसूत्रीकरण करण्यात आले आहे. त्यानुसार २१- मलकापूर विधानसभा मतदारसंघामध्ये नांदुरा येथे नवीन मतदार केंद्राची निर्मिती करण्यात आली असून आता मलकापूर मतदारसंघात ३०५ मतदान केंद्र झाले आहेत.

मतदान केंद्राच्या रचनेत सुसूत्रता आणण्यासाठी ज्या मतदान केंद्रांवर मर्यादेपेक्षा जास्त मतदार आहेत किंवा दोन गावातील मतदार एकाच मतदान केंद्रांना जोडण्यात आलेले होते, असे सर्व मतदान केंद्र मिळून जिल्ह्यात नव्याने २३ मतदान केंद्रांची निर्मिती करण्यात आली आहे. यामध्ये मलकापूर विधानसभा मतदारसंघातील नांदुरा येथील श्री शिवाजी हायस्कूलमधील खोली क्र. १ या मतदान केंद्राची निर्मिती करण्यात आली आहे. त्यामुळे मलकापूर विधानसभा मतदारसंघात ३०५ मतदान केंद्र झाले असून शहरी भागात ९१ तर ग्रामिण भागात २१४ मतदान केंद्र आहेत. नवीन मतदान केंद्राच्या निर्मितीमुळे कुटुंबातील सर्व मतदारांची नावे एकाच मतदान केंद्रावर उपलब्ध होणार आहेत.



२१-मलकापूर मतदारसंघात २ लक्ष ८७ हजार ८५५ मतदार असून त्यामध्ये १ लक्ष ४९ हजार ८३७ पुरुष तर १ लक्ष ३८ हजार १२ महिला व ६ तृतीयपंथी मतदार आहेत. ८५पेक्षा जास्त वयोमान असलेले मतदार ३ हजार ३३ असून १ हजार १६९ पुरुष तर १ हजार ८६४ महिला मतदार आहेत. तसेच विधानसभा निवडणुकीमध्ये प्रथमच मतदानाचा हक्क बजावणारे ७ हजार ४६६ नवमतदार असून ४ हजार ६८७ पुरुष तर २ हजार ७७९ महिला नवमतदार आहेत.

लोकसभेला जिल्ह्यात २ हजार २६५ व एक सहायकारी मतदान केंद्र असे एकूण २२६६ मतदान केंद्रे होती. यात २३ नवीन मतदान केंद्रांची वाढ होऊन २ हजार २८८ मतदान केंद्रे स्थापन करण्यात आलेली आहेत. दि. १ जुलै २०२४ अर्हता दिनांकावर आधारित मतदार याद्यांचा दुसऱ्या विशेष संक्षिप्त पुनर्रीक्षण कार्यक्रमांतर्गत मतदान केंद्र सुसूत्रीकरणांतर्गत मतदान केंद्रात वाढ करण्यात आली आहे.

नांदुरा येथील श्री शिवाजी हायस्कुलमधील मतदान केंद्रातील क्रमांक १०१ व १०२ हे एकाच ठिकाणी असून दोन्ही मतदान केंद्रावरील मतदारांची संख्या मर्यादेपेक्षा जास्त झालेली असल्यामुळे दोन्ही मतदान केंद्रातील ४८० व ४१० असे एकूण ८९० मतदार कमी करुन नवीन मतदान केंद्र क्रमांक १०३ श्री शिवाजी हायस्कूल, दक्षिण बाजूच्या पुर्व पश्र्िचम इमारतीमधील पूर्वेकडून खोली क्र. १ या मतदान केंद्राची निर्मिती करण्यात आली आहे.

मतदान यादीत नाव असल्याची मतदारांनी खात्री करावी- जिल्हाधिकारी

भारत निवडणूक आयोगाने घोषीत केलेल्या कार्यक्रमानुसार दि. २० नोव्हेबर २०२४ रोजी मतदान होणार आहे. लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी सर्व मतदारांनी मतदानाच्या दिवशी मतदान करावे. यासाठी मतदारांनी आपले नाव मतदार यादीत असल्याची खात्री करुन घ्यावी. मतदार केंद्र जाणून घेण्यासाठी व्होटर हेल्पलाईन प किंवा ीेंशीी.शलळ. र्सीें.ळप या संकेतस्थळाचा वापर करावा. तसेच मतदार नोंदणी किंवा मतदान केंद्राची माहिती शोधण्याच्या बाबतीत काही मदत हवी असल्यास १९५० या टोल फ्री क्रमांक किंवा मलकापूर मतदारसंघासाठी हेल्प लाईन क्रमांक १८००२३३२५५८ वर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

# आमदार रायमुलकरांच्या विजयाचे साकडे घालण्यासाठी भाविक संत नगरीकडे रवाना

## आमदार रायमुलकर दाम्पत्यांनी केला भाविकांचा सत्कार

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी** : मेहकर मतदार संघाचे तब्बल तीन टर्मपासून असलेले आमदार संजय रायमुलकर यांनी यावेळेस आमदारकीच्या विजयाचा चौकार मारावा, यासाठी मतदार संघातील शेकडो वारकर्यांनी संतनगरी शेगाव येथे जाऊन श्री संत गजानन महाराज चरणी साकडे घालण्यासाठी दि.२९ ऑक्टोबर रोजी सकाळी रवाना झाले. यावेळी आमदार संजय रायमुलकर व त्यांच्या पत्नी रंजना रायमुलकर यांनी भाविकांचा सत्कार करून त्यांचे दर्शन घेतले त्यांना संत नगरीकडे रवाना केले. मेहकर मतदार संघाचे आमदार संजय रायमुलकर हे गेल्या पंधरा वर्षापासून या मतदार संघाचे प्रतिनिधित्व करीत आहेत. त्यामुळे त्यांचे मतदार संघातील प्रत्येकांशी जिव्हाळ्याचे संबंध आहेत.तसेच वारकर्यांचेही विशेष प्रेम आ.संजय रायमुलकर यांच्यावर असल्याचे दिसून येत आहे.

यावेळी विधानसभा निवडणुकीचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी वारकरी परंपरेप्रमाणे शेकडो दिंड्या पालख्या काढून आ. संजय रायमुलकर यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. यावरून आमदाराची लोकप्रियता दिसून आली आहे. ज्या प्रमाणे हजारो वारकरी उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी आले होते.तर आता शेकडो वारकर्यांनी संतनगरी शेगाव येथे जाऊन श्रीसंत गजानन महाराज चरणी साकडे घालून आ. संजय रायमुलकर यांनी विजयाचा चौकार मारावा, अशी प्रार्थना श्रीचरणी करणार आहेत. यासाठी दि.२९ ऑक्टोबर रोजी सकाळी शेंदला येथून ५०० पेक्षा जास्त भाविक संत नगरी शेगावकडे रवाना झाले. यावेळी आ. संजय रायमुलकर व त्यांच्या पत्नी रंजना रायमुलकर यांनी उपस्थिती लावून वारकऱ्यांचे दर्शन घेऊन सत्कार केला. यावेळी वारकऱ्यांनी तुम्ही येत्या निवडणुकीत भरघोस मताधिक्यांनी विजयी व्हावेत अशी प्रार्थना श्री संत गजानन महाराजांच्या चरणी करण्यासाठी आम्ही शेगाव येथे जात असल्याचे सांगितले. शेंदला येथे गजानन महाराज मंदिरात आरती पूजाअर्चा करून आ. रायमुलकर यांनी भाविकांना श्रीच्या दर्शनाकरता रवाना केले.मतदार हे निःसीम प्रेम पाहून आ. रायमुलकर यांना अक्षरशः गहिवरून आले.







### माय माऊलीच्या प्रेमाने आमदार गहिवरले

मतदार संघातील मायमाऊली व मतदारांचे एवढे प्रेम लाभलेला मी २८८ आमदारांमधील एकमेव आमदार असेल. मतदार संघातील लाभलेले प्रेम हे माझे भाग्य आहे.अशी प्रतिक्रिया आ. संजय रायमुलकर यांनी दिली. तर माय माऊलींच्या या स्नेहाने आमदार रायमुलकर हे गहिवरून आले, त्यांची डोळेही पानावले.

## वैशाली सुर्यवंशी यांना स्वत:बद्दल आत्मविश्वास नाही म्हणून माझ्यावर आरोप करतात- किशोर पाटील

दैनिक आपला विदर्भ

**पाचोरा/प्रतिनिधी** : पाचोरा – भडगाव विधानसभा मतदारसंघांमध्ये महाविकास आघाडीच्या उमेदवार वैशाली सुर्यवंशी यांनी आज पत्रकार परिषद घेऊन सत्ताधारी आमदार हे सत्तेचा गैरवापर करून नावांमध्ये साम्य असलेले उमेदवार अर्ज दाखल करीत आहे सरळ सदर उमेदवारांवर दबाव टाकून व अधिकाऱ्यांवर दबाव टाकून उमेदवारी शेवटच्या दिवशी साम्य नाव असलेली महिला उमेदवार आणून त्यांचा फॉर्म भरला आहे. त्यांच्यासोबत सत्ताधारी आमदाराचे कार्यकर्ते गाडीमध्ये दिसत आहे असा आरोप केला आहे. याबाबत महायुतीचे उमेदवार शिंदे गटाचे आमदार किशोर पाटील यांनी सांगितले की डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या घटनेनुसार प्रत्येकाला उभे राहण्याचा अधिकार आहे. प्रत्येकाला वाटतं की आपणही आमदार झाला पाहिजे त्यामुळे त्यांना वाटलं त्यांनी उमेदवारी दाखल केली आहे त्यामुळे आपण अशी बंदी कोणावरही आणू शकत नाही.



# नांदुरा येथे १४९ किलो भेसळयुक्त खवा जप्त

## अन्न व औषधी प्रशासन अलर्ट मोडवर; भेसळ नियंत्रण समिती गठित

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : जिल्ह्यात दिवाळीच्या पार्श्र्वभूमीवर मोठ्या प्रमाणात दुग्धजन्य पदार्थाची विक्री केली जाते. यात अनेकवेळा भेसळ ही असते, ही भेसळ होवू नये याकरीता अन्न व औषध प्रशासनाने विशेष तपासणी मोहीम सुरु केली आहे. या विभागाने नुकतेच नांदुरा येथे भेसळयूक्त असल्याच्या संशयावरुन १४९ किलो खवा जप्त केला आहे. तसेच भेसळ थांबवण्यासाठी विशेष नियंत्रण समिती देखील गठित केली आहे.

जिल्ह्यात दिवाळीनिमित्त मिठाई व गोडधोड पदार्थ बनविण्यासाठी दूध व दुग्धजन्य पदार्थाचा वापर केला जातो. तर खवा, बर्फी, मावा, पेढा, मिठाई बनविण्यासाठी लागणारे दूध व खवा सारख्या पदार्थामध्ये अनेकवेळा भेसळ केली जाते. ही भेसळ रोखण्यासाठी भेसळ नियंत्रण समितीच्या वतीने जिल्हाभरात तपासणी मोहीम राबविण्यात आली होती. या मोहिमेत दूध व दुग्धजन्य पदार्थ, मिठाई, खादयतेल, तूप, फरसारण, रवा, बेसन आदी पदार्थांचे संशय असल्याने २२ नमूने जिल्ह्यातील मलकापूर, नांदुरा आणि सिंदखेड राजा, देऊळगाव राजा येथून घेण्यात आले आहे. ही कारवाई अन्न सुरक्षा अधिकारी जी.के.वसावे, जिल्हा दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी डॉ.डी.एन.काळे यांच्या मार्गदर्शनात करण्यात आली असून यावेळी नांदुरा रेल्वेस्थानक परिसरात ही तपासणी करण्यात आली.

नागरिकांनी सणासुदीत खबरदारी घ्यावी

सणासूदीतील दूध व दुग्धजन्य पदार्थांना अधिक मागणी असते. हे लक्षात या पदार्थामध्ये भेसळ करण्याची शक्यत वाढते. त्यासाठी समितीने जिल्हास्तरावर विशेष तपासणी मोहीम हाती घेतली आहे. नागरिकांनीही खबरदारी बाळगावी, असे आवाहन प्रमोद पाटील, सहायक आयुक्त, अन्न व प्रशासन यांनी केले आहे.

# मेहकर विधानसभा मतदारसंघात तब्बल ३० उमेदवार रिंगणात; वीस उमेदवार अपक्ष

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी** : बुलढाणा जिल्ह्याच्या राजकीय केंद्रबिंदू असलेल्या मेहकर विधानसभा मतदारसंघात विधानसभा निवडणुकीसाठी चांगलीच रंगत आली असून जसेजसे वातावरण निवडणूक जवळ येत आहे. तसतसे राजकीय वातावरण चांगलेच गरम होत आहे. मेहकर मतदार संघात तब्बल ३० उमेदवार आपले नशीब आजमावित आहेत.यामध्ये १० उमेदवार हे विविध पक्षांकडून तर, तब्बल २० उमेदवार हे अपक्ष म्हणून रिंगणात आहेत. यामध्ये उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाकडून सिद्धार्थ रामभाऊ खरात, महाराष्ट्र नवनिर्माण सेना पक्षाकडून भैय्यासाहेब गोविंदराव पाटील, शिवसेना पक्षाकडून संजय भास्कर रायमुलकर, बहुजन समाज पार्टी पक्षाकडून संजय समाधान कळसकर, वंचित बहुजन आघाडी पक्षाकडून डॉ. ऋतुजा ऋषांक चव्हाण, महाराष्ट्र स्वराज पार्टी पक्षाकडून दीपक केदार, जय सेवालाल बहुजन विकास पार्टी पक्षाकडून नितीन बालमहेंद्र सदावर्ते, राष्ट्रीय समाज पक्षाकडून रजनीकांत सुधीर कांबळे, रिपब्लिकन सेना पक्षाकडून संघपाल कचरू पनाड, आजाद समाज पार्टी (कांशीराम) पक्षाकडून संदीप शामराव खिल्लारे हे उमेदवार रिंगणात असून आपले नशीब आजमावत आहेत.तर अपक्ष म्हणून अशोक वामन हिवाळे, अड्. ओम श्रीराम भालेराव, कैलास कचरू खंदारे, सिद्धार्थ प्रल्हाद खरात, डॉ. गोपालसिंह बछिरे डॉ. जितेश वसंत साळवे, डॉ.जानू जगदेव मानकर,देविदास पिराजी सरकटे, नरहरी ओंकार गवई, प्रकाश गणपत अंभोरे, प्रकाश चिंधाजी गवई, पुनम विजय राठोड, भास्कर गोविंदा इंगळे, महिपत पुंजाजी वाणी, मुरलीधर दगडू गवई, राजेश अशोकराव गवई, लक्ष्मणराव जाणुजी घुमरे, वामनराव सूर्यभान वानखडे, डॉ. संतोष चंद्रकांत तायडे डॉ. सांची सिद्धार्थ खरात हे उमेदवार अपक्ष म्हणून नशीब आजमावत आहेत. दि. ४ नोव्हेंबर रोजी उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटचा तारीख असून त्यानंतर मतदार संघातील राजकीय चित्र स्पष्ट होणार आहे.

## सरवणकरांची अमित ठाकरेंसाठी माघार? फडणवीसांच्या विधानाने चर्चेला उधाण

**मुंबई/प्रतिनिधी** : विधानसभा निवडणुकीसाठी मुंबईमधील माहीम मतदारसंघातून मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या पक्षाचे उमेदवार सदा सरवणकर यांनी उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत संपण्याच्या काही तास आधी अर्ज दाखल केला. या मतदारसंघातून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरेंचे पुत्र अमित ठाकरे यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. त्यामुळेच लोकसभेला नरेंद्र मोदींना तिसऱ्यांदा पंतप्रधान बनवण्यासाठी आपला महायुतीला बिनशर्त पाठींबा असेल असे जाहीर करणाऱ्या राज ठाकरेंच्या पुत्रासाठी महायुती समर्थन देण्यास सकारात्मक भूमिकेत होती.

# जयश्रीताईंचे विधानसभेत जाणे राज्यघटनेला बळ देणारे ठरेल- मुकुल वासनिक

## मशालीच्या आगीत गद्दार गाडले जातील – जयश्रीताई शेळके

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : ज्या दिवशी जयश्रीताई शेळके विधानसभेची पायरी चढतील तो दिवस लोकशाही मानणाऱ्या लोकांसाठी खऱ्या अर्थाने विजयी दिवस असेल. बुलढाण्यात लोकशाही विरुद्ध गुंडशाही सुरू आहे. जयश्रीताईंचे विधानसभेत जाणे हे शिव, शाहू, फुले, आंबेडकरी विचारांना तसेच राज्यघटनेला बळ देणारे ठरेल, असे प्रतिपादन काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मुकुल वासनिक यांनी आज केले. तर महिला आहे म्हणून कमजोर कमजोर समजू नका. महिषासुराचा वध एका महिलेनेच केला आहे. तुम्ही पाच वर्षे समाजाला धमकावण्याचे काम केले. दडपशाही केली, आणि आज मतांसाठी तुम्हाला बैठका,समाज आठवतो. मात्र मशालीच्या आगीत गद्दार गाडले जातील असा घनाघात जयश्रीताई शेळके यांनी केला.

महाविकास आघाडी बुलढाणा विधानसभा मतदार संघाच्या उमेदवार जयश्रीताई शेळके यांचा उमेदवारी अर्ज आज दाखल करण्यात आला. दुपारी टिळक नाट्य क्रीडा मंदिर परिसरात महाविकास आघाडीने प्रचंड शक्ती प्रदर्शन व विराट सभा घेतली. यावेळी राष्ट्रवादीचे नेते आमदार डॉक्टर राजेंद्र शिंगणे ,शिवसेनेचे संपर्कप्रमुख नरुभाऊ खेडेकर, जिल्हाप्रमुख जालिंदर बुधवत ,आमदार धीरज लिंगाडे, माजी आमदार रेखाताई खेडेकर, शिवसेनेचे नेते छगन मेहत्रे, विजय अंभोरे, सुनील सपकाळ, राष्ट्रवादीचे प्रदेश प्रवक्ता विकास लवांडे ,नरेश शेळके ,एडवोकेट गणेश पाटील, दिलीप जाधव, डी एस लहाने, सुमित सरदार, पीएम जाधव ,लखन गाडेकर, सुनील घाटे, संदीप शेळके, विनोद बेंडवाल, बीटी जाधव ,अनिल बावस्कर संजीवनी वाघ, नंदिनी टारपे, अनिताताई शेळके, संगीताताई राठोड, संजय किनगे महाविकास आघाडीचे नेते,कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



पुढे बोलताना मुकुल वासनिक यांनी बुलढाण्यातील दडपशाही वर सडकून टीका केली. ते म्हणाले इथल्या लोकप्रतिनिधीने बुलढाणा मतदार संघाचे प्रश्र्न विधानसभेत मांडने अपेक्षित होते. मात्र दरोडे टाकावे तसे राजकारण बुलढाण्यात झाले. दडपशाही, गुंडशाही ,फोपावली आहे, हे सर्व मोडून करण्यासाठी आता चांगली संधी चालून आली आहे. जयश्रीताई शेळके यांचे विधानसभेत जाणे हे त्यामुळेच लोकशाही मानणाऱ्या वर्गासाठी महत्त्वाचे ठरते. ज्या दिवशी त्या विधानसभेत जातील तो दिवस राज्यघटनेला बळ देणारा ठरेल. काँग्रेसचा प्रत्येक कार्यकर्ता स्वतः उमेदवार असल्यासारखी ही निवडणूक लढवून जयश्रीताई शेळके यांना विजयी करेल असा विश्र्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. तर जयश्रीताई शेळके यांनी महापुरुष हे आमची अस्मिता असल्याचे सांगितले. त्या म्हणाल्या महापुरुषांचा मान सन्मान हे आम्ही कर्तव्य मानतो. बुलढाण्यामध्ये स्ट्रक्चरल ऑडीटची मागणी आम्ही केली होती. मात्र इथे बसवण्यात आलेले पुतळ्यांचे ऑडिट झाले नाही. छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळला तसा महापुरुषांच्या अस्मितेला धक्का लागलेला आम्ही सहन करणार नाही. पुतळे उभे करणाऱ्यांचा आणि महापुरुषांचा वैचारिक संबंध येतो कुठे? पुतळे उभारण्यापेक्षा त्यांच अनुकरण तुम्ही कधी करता का ? असा सवाल त्यांनी केला. आपल्याला हे सर्व बदलून टाकायचे आहे. कुणाच्याही धमक्यांना घाबरू नका... पुढे या असे आवाहन त्यांनी केले. लोकशाही विरुद्ध गुंडशाही या लढाईत आपणच जिंकणार ही काळ्या दगडावरची रेघअसल्याचे त्या म्हणाल्या.

### आपल्या हक्कासाठी जयश्रीताई शेळके यांना विधानसभेत पाठवा - सुषमाताई अंधारे

राज्यात लेकी बाळी सुरक्षित नाही. ७० वर्षाच्या आजीपासून साडेतीन वर्षाच्या चिमूरडी पर्यंत अत्याचार होत आहे. ज्यांना आई बहिणीची इज्जत कळत नाही, ते लाडके भाऊ होऊ शकत नाही. आणि इथल् आगे मोहोळ तर जयश्रीताईंच्या धुरळ्यात कुठे हरवेल पत्ताही लागणार नाही. बुलढाण्यातील गुंडशाही विरुद्ध लोकशाहीच्या लढयात लोकशाही मानणाऱ्या जयश्री शेळके यांचा विजय निश्र्चित असल्याचे त्या म्हणाल्या. सुषमाताईंनी शासनाने आणलेल्या लाडक्या बहिण योजनेवर सडकून टीका केली.भाऊ बहिणीच लग्न लावतो, व्याजाने पैसे घेतो, वावर विकतो , सर्व काही करतो मात्र याचा बॅनर कधी लावत नाही. शिंदे ,फडणवीस, अजित पवार सरकार बहिणीच्या हातावर पंधरा टिकल्या टिकवून बॅनर बाजी करत आहे. हे सरकार मतांचा व्यापार करणारे व्यापारी असल्याची टीका त्यांनी केली. ज्यांना बहिणीची मर्यादाच कळली नाही ते लाडके भाऊ होऊच शकत नाही असे त्या म्हणाल्या. महिलांसाठी व सर्व सामान्यांसाठी जीवाचे रान करणाऱ्या आणि गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक चळवळीत काम करणार्या जयश्रीताईना विधानसभेत पोहोचविण्याचे आवाहन त्यांनी केले

### बुलढाण्यात दुसऱ्यांदा संधी नाही - डॉ. राजेंद्र शिंगणे

बुलढाणा मतदारसंघातून कोटमकर बाई व सुमनताई पाटील यांना विधानसभेत जाण्याची संधी मिळाली. तर आता जयश्रीताई शेळके ह्या विधानसभेत पोचणाऱ्या तिसरी महिला ठरतील असे राष्ट्रवादीचे नेते डॉक्टर राजेंद्र शिंगणे म्हणाले. बुलढाणा चा इतिहास वेगळा आहे. इथे मतदार दुसऱ्यांदा संधी देत नाही. जयश्रीताई ह्या घरोघरी पोहोचलेली बहीण आहेत. त्यामुळे विशिष्ट साड्या घालून इथे महिलांची उपस्थिती आणावी लागली नाही. कुठल्याही दडपनाला बळी न पडता मतदारांनी निर्भयपणे मतदान करून जयश्री शेळके यांना विजयी करण्याचे आवाहन त्यांनी केले. तर नरुभाऊ खेडेकर यांनी 'खोके सरकार ' घालवण्याच आवाहन केले. बुलढाणा ची ओळख मारामारी व मारहाण अशी झाली आहे.हे बदलणे आपली जबाबदारी असून ५० खोक्यात खरेदी होणारे घरी पाठवण्याची वेळ आता आली आहे असे नरूभाऊ खेडेकर म्हणाले.

### बहिणीच्या पाठीशी हा भाऊ खंबीरपणे उभा आहे - बुधवत

आम्ही रामाचा आदर्श मानतो. रामाच्या राज्यभिषेकाची तयारी झाली, पण दुसऱ्या दिवशी त्याला वनात जावे लागले. हे सर्व प्रामाणिक पने त्याने स्वीकारले तो आदर्श आम्ही मानतो. विधानसभेत जाण्याची माझी इच्छा होती. परंतु तिकीट माझ्या बहिणीला जयश्रीताई यांना देण्यात देण्यात आले, त्यामुळे आता प्रामाणिकपणे त्यांचं काम करणार आहे. बहिणीच्या पाठीशी हा भाऊ खंबीरपणे उभा राहिल असे जालिंदर बुधवत म्हणाले. यावेळी छगन मेहेत्रे, नरेश शेळके, डीएस लहाने, अशोकराव गव्हाणे, पी.एम.जाधव, गणेशसिंग राजपूत आदींनी मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाचे संचलन पत्रकार रणजितसिंग राजपूत यांनी तर आभार सुनील सपकाळ यांनी मानले.